जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2017
सकाळ

# मुंबई विद्यापीठाचा कार्यभार कुलगुरू डॉ. शिंदे यांच्याकडे


**डॉ. देवानंद शिंदे**

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे मुंबई विद्यापीठाचा अतिरिक्त कारभार देण्यात आला आहे. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख रजेवर गेल्यामुळे त्यांच्या रजेच्या कालावधीत डॉ. देवानंद शिंदे प्रभारी कुलगुरू म्हणून काम पाहणार आहेत. राज्यपाल विद्यासागर राव यांनी डॉ. देशमुख यांची रजा मंजूर केली असून त्यांच्या ठिकाणी प्रभारी म्हणून डॉ. देवानंद शिंदे यांची नियुक्ती केली आहे. सध्या मुंबई विद्यापीठात पेपर तपासणी आणि निकाल लावणे यावरून वाद-गोंधळ सुरू आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 AUG 2017 तरुण भारत

# मुंबई विद्यापीठाचा कारभार डॉ. शिंदेंकडे

**कोल्हापूर :** मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अधिकचा कार्यभार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी स्विकारला. कुलपती कार्यालयाकडून पुढील आदेश येईपर्यंत डॉ. शिंदे मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदी कार्यरत राहणार आहेत. तर मुबई विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरूपदी व्हीजेटीआयचे संचालक धीरेन पटेल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई विद्यापीठाच्या अनेक अभ्यासक्रमांचे निकाल रखडले होते. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन अभ्यासक्रमांचे निकाल निर्धारित वेळेत लागावेत या उद्देशाने, राज्यपालांच्या आदेशाने ऑनलाईन पद्धतीने उत्तरपत्रिका तपासणीसाठी शिवाजी विद्यापठासह राज्यातील इतर विद्यापीठांनी मदतीचा हात पुढे केला. तरीदेखील राज्यपालांनी दिलेल्या वेळेत मुंबई विद्यापीठाचे निकाल लागू शकले नाहीत. यावर



अनेक विद्यार्थी संघटनांसह राजकीय पक्षांनी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. तसेच मुंबई विद्यापीठातील परीक्षेच्या गोंधळासंदर्भात शिक्षणमंत्री विनोद तावडे स्वत: राज्यपालांना जाऊन भेटले होते. परिणामी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी राज्यपाल तथा कुलपती विद्यासागर राव यांच्याकडे रजा मागितली होती. डॉ. देशमुख यांची रजा राज्यपालांनी मंजूर केल्याने, त्यांच्या रजेच्या कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे कुलगुरूपदाचा कार्यभार सांभाळणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 AUG 2017 लोकमत

# मुंबई विद्यापीठाला प्रभारी कुलगुरु

## देवानंद शिंदे यांच्याकडे कार्यभार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाचे सर्व निकाल अद्याप जाहीर झाले नसतानाच कुलगुरु डॉ. संजय देशमुख हे अचानक सुट्टीवर गेले आहेत. तर, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. देवानंद शिंदे यांची प्रभारी कुलगुरु म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई विद्यापीठात बुधवारचा दिवस नाट्यमय ठरला. लाखो उत्तरपत्रिकांची तपासणी बाकी असून (पान ९ वर)

मुंबई विद्यापीठाच्या उत्तरपत्रिका तपासणीकामी मदत करण्याच्या जबाबदारीपाठोपाठ तेथील कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे बुधवारी सोपविण्यात आला आहे. यापूर्वी दि. १५ मे रोजी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार काही दिवसांसाठी कुलगुरु डॉ. शिंदे यांच्यावर कुलपती कार्यालयाने सोपविला होता.



# मुंबई विद्यापीठाला प्रभारी कुलगुरु

(पान १ वरुन)

विद्यापीठाने अद्याप दीडशेहून अधिक अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केलेले नाहीत. यावरुन टीकेचे लक्ष्य ठरलेले कुलगुरु डॉ. देशमुख यांनी मागितलेली रजा राज्यपालांनी मंजूरही केली आहे.

त्यामुळे डॉ. देशमुख यांना सक्तीची रजा दिल्याची चर्चा विद्यापीठात रंगली आहे. मुंबई विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरु म्हणून व्हीजेआयटीचे संचालक डॉ. धीरेन पटेल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या ४७७ अभ्यासक्रमांच्या परीक्षांपैकी ३०० अभ्यासक्रमांचे निकाल बुधवारपर्यंत जाहीर झाले आहेत.

> मोठी शिक्षण परंपरा असलेल्या मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळण्याची जबाबदारी म्हणजे शिवाजी विद्यापीठासह पश्चिम महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेचा सन्मान आहे. कुलपतींनी सोपविलेल्या या जबाबदारीमुळे शिक्षण क्षेत्रातील शिवाजी विद्यापीठाचे असलेली विश्वासार्हता दृढ झाली आहे. मुंबई विद्यापीठातील उत्तरपत्रिका तपासणी कामाचा उद्या आढावा घेणार आहे. यासाठी संवाद, सहकार्य आणि सहभाग या त्रिसूत्रीनुसार काम करणार आहे.
>
> -डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु.

1 0 AUG 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. देवानंद शिंदेंकडे मुंबई विद्यापीठाचा कार्यभार

## निकालातील सावळागोंधळामुळे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांची गच्छंती

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठातील निकालाचा सावळागोंधळ, अनागोंदी कारभार आदी कारभारामुळे चर्चेत असलेले मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख अचानक रजेवर गेल्याने राज्यपाल सी. विद्यासागर यांनी मुंबई विद्यापीठाचा कारभार कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे तत्काळ सोपवला आहे. राजभवनातून ही नियुक्ती तातडीने केल्याने संजय देशमुख यांची गच्छंती आता अटळ आहे.

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी घेतलेल्या ऑनलाईन अॅसेसमेंटच्या निर्णयाचा मोठा फटका तब्बल ४.५० लाख विद्यार्थ्यांना बसला आहे. यामुळे ऑगस्ट आला तरी मुख्य परीक्षेचे निकाल जाहीर झालेले नाहीत. निकाल जाहीर करण्यासाठी राज्यपालांनी दिलेली ३१ जुलैची मुदतही कुलगुरूंना पाळता आली नाही. त्यानंतर ५ ऑगस्टची मुदत देऊनही पदवीचे निकाल लावण्यात कुलगुरू अपयशी ठरले असून, आजपर्यंत विद्यापीठाचे अद्याप १५० हून निकाल बाकी आहेत. साडेचार लाखांपैकी केवळ ५० हजार विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर झाले आहेत.

निकालाची डेडलाईन पाळण्यात कुलगुरूंच्या सावळागोंधळाचे तीव्र पडसाद विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत उमटले. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष अशा दोन्ही बाजूच्या सदस्यांनी कुलगुरू देशमुख यांच्यावर सडकून टीका केली. त्याचबरोबर विद्यार्थी संघटनांनी जोरदार मोर्चे काढून देशमुख यांना कुलगुरुपदावरून हटविण्याची मागणी केली होती.

कुलगुरू डॉ. देशमुख वैयक्तिक कारण देऊन रजेवर गेले असल्याने त्यांच्या जागी कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना अतिरिक्त भार देण्यात आला असल्याची माहिती राजभवनातून देण्यात आली असली, तरी कुलगुरूंना हटविण्याचे अधिकार राज्यपालांना आहेत. राज्यपाल स्वतः देशमुख यांच्या कारभारामुळे नाराज आहेत. निकाल लागण्यास विलंबाचा परिणाम थेट विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर होत आहे. या पार्श्वभूमीवर कुलगुरू रजेवर जाण्याऐवजी त्यांना सक्तीच्या रजेवरच पाठवले असल्याची चर्चा विद्यापीठ वर्तुळात सुरू आहे.

### 'व्हीजेटीआय'चे पटेल नवे प्रभारी प्र-कुलगुरू

तब्बल दोन वर्षांहून अधिक काळ रिक्त राहिलेल्या मुंबई विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदासाठी 'व्हीजेटीआय'चे संचालक धीरेन पटेल यांची प्रभारी प्र-कुलगुरूपदी निवड राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी केली आहे. विद्यापीठाचा प्रशासकीय कारभार, तसेच परीक्षा विभागाची जबाबदारी असलेले हे पद गेल्या दोन वर्षांपासून अधिक काळ रिक्त होते. डॉ. राजन वेळुकर कुलगुरू असताना नरेशचंद्र यांनी राजीनामा दिल्यानंतर संजय देशमुख यांची ७ जुलै २०१५ रोजी नियुक्ती झाल्यानंतरही हे पद रिक्त होते. पटेल यांची नियुक्ती ही सर्व निकाल लागेपर्यंत किंवा आगामी तीन महिन्यांसाठी केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2017
महाराष्ट्र टाईम्स

# कुलगुरू शिंदेंकडे मुंबईचा कार्यभार

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाच्या लाखो विद्यार्थ्यांचे निकाल रखडलेले असताना कुलगुरू डॉ. संजय देशमुख अचानक रजेवर गेले आहेत. त्यामुळे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी मुंबई विद्यापीठाचा अतिरिक्त कारभार कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे तात्काळ सोपविला आहे. कुलगुरूंनी वैयक्तिक कारणांमुळे सुट्टी घेतली असल्याचे राजभवनाकडून सांगण्यात आले असले तरी कुलगुरूंना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आल्याची चर्चा दुपारपासूनच विद्यापीठात रंगताना दिसली. दरम्यान, बुधवारी सकाळीच राजभवनातर्फे प्र-कुलगुरूपदी 'व्हीजेटीआय'चे संचालक धीरेन पटेल यांची तात्पुरती निवड करून कुलगुरूंची कोंडी केल्याची चर्चा विद्यापीठात कानावर पडली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2017

पुण्यनगरी

# कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे मुंबई विद्यापीठाचा पदभार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** मुंबई विद्यापीठाच्या निकालात होणाऱ्या दिरंगाईमुळे आणि यामुळे निर्माण झालेल्या वादानंतर कुलगुरू डॉ. संजय देशमुख अचानक रजेवर गेले आहेत. यामुळे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. देवानंद शिंदे यांच्याकडे मुंबई विद्यापीठाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.



डॉ. संजय देशमुख यांनी राज्यपाल आणि कुलपती सी. विद्यासागर राव यांच्याकडे रजेचा अर्ज केला होता. राज्यपालांनी त्यांची रजा मंजूर केली आहे. त्यामुळे देशमुख यांची रजा संपेपर्यंत कुलगुरू प्रा. देवानंद शिंदे यांच्याकडे मुंबई विद्यापीठाचा अतिरिक्त कार्यभार राहणार आहे, तर मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदी प्रा. धीरेन पटेल यांची निवड करण्यात आली आहे.

10 AUG 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठाचा उपक्रम** : १६० किलो प्लास्टिक वेचले; एनएसएस स्वयंसेवक, विद्यार्थी, शिक्षकांचा सहभाग

# क्रांतिदिनी शहरात स्वच्छता मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाने शहर स्वच्छतेप्रती आपली बांधीलकी जोपासत क्रांतिदिनानिमित्त शहरातील विविध पुतळ्यांच्या परिसरासह मध्यवर्ती बसस्थानक, रेल्वे स्थानक परिसरात बुधवारी स्वच्छता मोहीम राबविली. या मोहिमेतून घनकचरा, काच सामान याशिवाय सुमारे १६० किलो प्लास्टिक कचरा वेचण्यात आला.

विद्यापीठ, महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) माध्यमातून सकाळी आठ ते अकरा या वेळेत रोटरी क्लब ऑफ करवीर, रोटरी चॅरिटेबल ट्रस्ट आणि कोल्हापूर महानगरपालिकेच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

या स्वच्छता मोहिमेत 'एनएसएस'चे सुमारे एक हजार स्वयंसेवक सहभागी झाले. सकाळी आठ वाजता मध्यवर्ती बसस्थानक परिसरात प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. या मोहिमेत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, एनएसएसचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, कोल्हापूर बसस्थानकाचे आगारप्रमुख सुनील शिंदे, वाहतूक नियंत्रक आर. बी. मोगे, विजय फाळके, 'रोटरी क्लब'चे एस. एन. पाटील, विशाळ जांभळे, प्रमोद चौगुले, ज्ञानदेव केसरकर, हरेष पटेल, कुशल पटेल, मनोज कोळेकर, शीतल दुग्गे, किरण खटावकर, काशीनाथ सांगावकर, आदी सहभागी झाले.



कोल्हापुरात बुधवारी क्रांतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. रेल्वेस्थानक परिसरात 'एनएसएस'च्या स्वयंसेवकांनी श्रमदान केले.

## या परिसरात राबविली मोहीम

संत गाडगेबाबा, राजमाता जिजाऊ, राजर्षी शाहू महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराराणी आईसाहेब, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पैलवान खाशाबा जाधव, जी.कांबळे, राजीव गांधी, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार पुतळा, श्रीपतराव बोंद्रे यांच्या पुतळ्याचा परिसर आणि बिंदू चौक, शिवाजी चौक, माऊली चौक, निवृत्ती चौक, न्यू पॅलेस, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद परिसर, आरटीओ कार्यालय, इरिगेशन चौक परिसर, राजर्षी शाहू महाराज जन्मस्थळ, मध्यवर्ती इमारत परिसर, आर. के. नगरमधील गणपती मंदिर परिसर, शाहू नाका, उड्डाणपूल, कणेरीमठ परिसर, विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे, डॉ. आप्पासाहेब पवार, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यांची विद्यापीठातील अधिविभागांमार्फत स्वच्छता करण्यात आली.

## या महाविद्यालयांचा सहभाग

कॉमर्स आणि नाईट कॉलेज, डी. डी. शिंदे सरकार महाविद्यालय, के.एम.सी कॉलेज, कमला महाविद्यालय, शहाजी कॉलेज, राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, राजाराम महाविद्यालय, गोखले महाविद्यालय, न्यू कॉलेज, महावीर महाविद्यालय, विवेकानंद महाविद्यालय, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी अॅन्ड इंजिनिअरिंग, केआयटी कॉलेज, धनंजय महाडिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले.

10 AUG 2017 **Times of India**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Over 10,000 volunteers clean up 15 statues in university's drive

TIMES NEWS NETWORK


TOI

The drive was conducted near the Chhatrapati Shahu Maharaj terminus and other important places

**Kolhapur:** Over 10,300 students and volunteers joined hands for the special cleanliness drive held at various junctions in the city on Wednesday.

National Service Scheme (NSS) volunteers from Shivaji university, Kolhapur (SUK) in association with the Rotary Club of Karveer and the officials from the Kolhapur Municipal Corporation cleaned as many as 15 statues in the city.

Acting Pro-VC D T Shirke flagged off the drive at 8am from the central bus stand.

The drive passed by locations such as Bindu chowk, Shivaji chowk, Dasara chowk, central bus stand, Chhatrapati Shahu Maharaj terminus and other important junctions. Senior SUK officials were also a part of the cleanliness drive.

"The cleanliness activity mainly focussed on the removal of plastic waste. Around 160kg of plastic waste was collected during the drive," an SUK official said.

Shirke said, "SUK has been involved in the cleanliness drive for the past few years now. Their initiative has also increased the participation of citizens along with students and other officials over these years."

"The NSS department and the Rotary club had distributed the essentials such as masks and plastic hand gloves for the safety of the participants," the official added.

Another SUK official said, "Majority of participants were students who were associated with NSS under the ministry of youth affairs and sports. The scheme was launched in 1969 across 37 universities involving 40,000 students. The focus of the drive is on the personality development of students through community service."

It has to be noted that SUK has organised cleanliness drive in the city after governor C Vidyasagar Rao had directed the SUK officials to engage in community service.

Earlier last week, SUK had participated in the cleanliness drive organised at Rankala lake.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 0 AUG 2017

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात क्रांतिवीरांना अभिवादन

## रक्तदान क्रांती महाअभियानात ८० जणांचा सहभाग

कोल्हापूर / प्रतिनिधी :

देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या शहिदांना क्रांतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. यानिमित्त विद्यार्थी कल्याण विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान क्रांती महाअभियानात ८० जणांनी रक्तदान केले.

सकाळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या गेट क्रमांक आठ येथील क्रांतिवनामधील स्मृतिस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, आयक्यूएसीचे संचालक डॉ. आर. के. कामत, दूरशिक्षण विभागाचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

दरम्यान, विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, अर्थशास्त्र अधिविभाग व आरोग्य केंद्र तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, कोल्हापूर आणि मंथन फौंडेशन, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या लोककला केंद्रामध्ये रक्तदान क्रांती महाअभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानांतर्गत ८० जणांनी रक्तदान केले. प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते या अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. रक्त संक्रमण अधिकारी डॉ. सुप्रिया लोखंडे, एस. पी. पंचगल्ले आदींसह अकरा जणांच्या पथकाने रक्तसंकलन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 AUG 2017 पुण्यनगरी

# क्रांतिदिनानिमित्त विद्यापीठातर्फे महास्वच्छता अभियान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाने क्रांतिदिनानिमित्त शहरातील पुतळ्यांसह मध्यवर्ती बस स्थानक आणि रेल्वे स्थानक परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. विद्यापीठ तसेच महाविद्यालयीन एन.एस.एस. स्वयंसेवकांच्या माध्यमातून सकाळी ८ ते ११ या कालावधीत रोटरी क्लब ऑफ करवीर, रोटरी चॅरिटेबल ट्रस्ट आणि कोल्हापूर महानगरपालिकेच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

उपक्रमात एक हजारांहून अधिक एनएसएसचे स्वयंसेवक सहभागी झाले होते. या मोहिमेंतर्गत शहरातील सुमारे १६० किलो प्लास्टिक कचरा वेचण्यात आला. बुधवारी सकाळी ८ वाजता मध्यवर्ती बस स्थानक परिसरापासून स्वच्छता मोहिमेची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांना स्वच्छतेविषयी संबोधित करून प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी या मोहिमेस प्रारंभ केला. सार्वजनिक ठिकाणे, राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमा यांच्या स्वच्छतेबरोबरच मनाच्या स्वच्छतेचाही संस्कार या मोहिमेच्या माध्यमातून रुजविला जाण्याची गरज आहे, असे डॉ. शिर्के म्हणाले.

बस स्थानक परिसरासह रेल्वे स्थानक परिसरात डॉ. शिर्के यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, ▶▶ पान २ वर

क्रांतिदिनानिमित्त विद्यापीठातर्फे महास्वच्छता अभियान

**(पान १ वरून)** राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी विद्यार्थ्यांसमवेत स्वच्छता करण्यात पुढाकार घेतला. यावेळी स्वच्छतेनंतर प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह सर्व अधिकाऱ्यांनी शहरातील सर्व पुतळ्यांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी विद्यार्थ्यांना एनएसएस विभाग आणि रोटरी क्लबतर्फे पुनर्प्रक्रियेसाठी प्लास्टिक गोळा करण्यास स्वतंत्र थैल्या, हातमोजे, मास्क उपलब्ध करून देण्यात आले होते. या मोहिमेत कोल्हापूर बस स्थानकाचे आगारप्रमुख सुनील शिंदे, वाहतूक नियंत्रक आर. बी. मोगे, विजय फाळके, रोटरी क्लबचे एस. एन. पाटील, विशाल जांबळे, प्रमोद चौगुले, ज्ञानदेव केसरकर, हरेष पटेल, कुशल पटेल, मनोज कोळेकर, शीतल दुग्गे, किरण खटावकर, काशीनाथ सांगावकर, विविध महाविद्यालयांचे एन.एस.एस.चे समन्वयक यांनी हे महास्वच्छता अभियान यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.



कोल्हापूर : शिवाजी महाराजांच्या पुतळयास अभिवादन करताना विद्यार्थी.

10 AUG 2017 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Varsity first in state to provide research grant for UG students

**Piyush.Bhusari**
@timesgroup.com



**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has announced a good news for the under-graduate students as they are soon going to organise a special research sensitization scheme in the current academic session.

In order to promote the research culture among students, SUK will be inviting research projects from the final year or the pre-final year UG students from its affiliated colleges. These colleges will be responsible to scrutinise the project at the preliminary stage and then forward it to the lead college.

D T Shirke acting pro vice-chancellor of SUK told **TOI**, "A maximum of Rs 10,000 research grant will be offered for every project. The lead college will be responsible to organise a guidance workshop for students where the experts will guide the students for better implementation of the project."

"This research scheme will provide a platform for students who generally participate in various research based competitions," he added.

Talking about the research based competition Shirke said that one such research competition is Avishkar, which is governed by the chancellors office where hundreds of students participate every year. Our scheme might boost these students to work prior and may be they can share their same project in Avishkar as well.

**Talking about the research based competition Shirke said that one such research competition is Avishkar, which is governed by the chancellors office where hundreds of students participate every year**

"This is one of its kind initiative and SUK will be the first in the state to launch it," he added.

According to SUK circular, it read that the research proposals will be invited from students by September 15, while the submission of those proposals to the lead college will be done by September 30. The final project will have to be submitted by January 15 next year.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 0 AUG 2017

लोकमत



**मयूरा रे...** श्रावणाचे आणि मोराचे अतूट नाते. पाऊस येणार असे सांगणाऱ्या मोराचे शिवाजी विद्यापीठ परिसरात हे छायाचित्र टिपले आहे सागर भोसले यांनी.

# हुतात्मांच्या मुलांना मोफत शिक्षणासाठी प्रयत्न : शिर्के

## शहीद स्फूर्ती केंद्राचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

**सातारा, ता. ९ :** शिवाजी विद्यापीठातर्फे तीन जिल्ह्यांतील हुतात्मा जवानांच्या मुलांना मोफत उच्च शिक्षण देण्यासाठी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे प्रयत्नशील आहेत. दोन वर्षांपूर्वी विद्यापीठाने स्फूर्ती केंद्र उभारण्याची संकल्पना मांडली, ती आज साकार झाली आहे. कार्यकारी समितीने पाच वर्षांचा आराखडा बनवला. या केंद्रात प्राधान्याने हुतात्मा जवानांचे कुटुंबीय, सैनिक कुटुंबीय व तरुणांना संधी दिली जाईल, असे आश्वासन प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के यांनी दिले.

शिवाजी विद्यापीठ संचलित शहीद स्फूर्ती केंद्राचे उद्घाटन येथील जिल्हा बँकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात जिल्हाधिकारी श्वेता सिंघल यांच्या हस्ते झाले. या वेळी शिर्के, रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर, कर्नल देवेन भारद्वाज, कॅप्टन उदाजी निकम, केंद्राचे समन्वयक तथा लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य आर. व्ही. शेजवळ, मेजर भानुदास झरे आदी उपस्थित होते.

या वेळी श्वेता सिंघल, डॉ. पाटील व प्राचार्य साळुंखे यांची भाषणे झाली.

**हाती टाळ्या... डोळ्यात भावाश्रू**

सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांतील हुतात्मा जवानांच्या कुटुंबीयांचा कृतज्ञतापूर्ण सन्मान केला. या वेळी उपस्थितांनी उभे राहत हुतात्मा जवान, कुटुंबीयांना अभिवादन केले. या वेळी बलिदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना मान्यवर, उपस्थितांच्या डोळ्यात भावाश्रूही तरळले होते.